# केटरिंग व्यावसायिकांमध्ये जनजागृती

### अन्न व औषध प्रशासनाचा उपक्रम

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**



जिल्ह्यातील केटरिंग व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांमध्ये चीज नालॉग व पनीर यांच्या वापराबाबत माहिती देऊन जनजागृती करण्यात आली. अन्न व औषध प्रशासनाच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त् श्रीधर डुबेपाटील यांनी चीज ॲनालॉग व पनीर वापराबददल अन्न व्यावसायिकांमध्ये जनजागृती करण्याबाबत परिपत्रकाद्वारे सूचित केले होते. त्या अनुषंगाने छत्रपती संभाजीनगर येथील केटरींग व्यावसायिकांची सहायक आयुक्त (अन्न) विवेक पाटील यांनी आज बैठक घेऊन त्यांना माहिती दिली. अन्न सुरक्षा मानके कायदा २००६, अंतर्गत असलेल्या तरतुदीबाबत माहिती दिली. तसेच अन्न सुरक्षततेसाठी सुचना दिल्या.

त्यांनी मार्गदर्शन केले की, कच्चे अन्न अनपदार्थ हे परवानाधारकांकडुन खरेदी करावे व त्याचे पक्के खरेदी बिल घ्यावे.ज्या ठिकाणी अनपदार्थ तयार करतात ती जागा सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने स्वच्छ असावी.अन्न पदार्थ तयार करत असतांना दर्जेदार कच्चे अन्न पदार्थ वापरावेत. पदार्थात चीज ॲनालॉगचा वापर करीत असल्यास त्याबददल ग्राहकांना तसे मेन्युकार्ड वर अथवा ऑर्डर घेतांना अवगत करावे.अन्न पदार्थ तयार करतांना वापरण्यात येणारे पाणी हे पिण्यायोग्य आहे त्याबाबतचा विश्लेषण अहवाल असावा.अन्न हाताळणेबाबतचे प्रशिक्षण घेतलेला कर्मचारी वर्ग असावा. अन्न हाताळणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना डोक्याला टोपी व ॲप्रॉन देण्यात यावे. अन्न साठवण्यासाठीची भांडी ही स्टीलची व स्वच्छ असावी. अन्न वाहतुक करतांना वापरण्यात येणाऱ्या वाहनांना अन्न परवाना घेणे गरजेचे आहे. तयार अन्न पदार्थामध्ये कायद्याने बंदी असलेला कुठलाही घटक पदार्थ वापरु नये.

केटरिंग असोसिएशनच्या वतीने प्रकाश देशपांडे, हितेंद्रसिंग ठाकुर, राजु सोनोने, कैलारा रोडे, सुनील विष्ध, प्रशांत मुरकुटे व अन्य ५० केटरींग व्यावसायिक हजर होते. तसेच प्रशासनाच्या वतीने सहायक आयुक्त विवेक पाटील अन्न सुरक्षा अधिकारी, श्रीमती वर्षा रोडे उपस्थित होत्या.

# प्राचार्य डॉ. विठ्ठल मोरे जीवनगौरव पुरस्काराने पी. एस. घाडगे सन्मानित!

**बीड । प्रतिनिधी**

मराठवाडा शिक्षक संघाचे माजी अध्यक्ष तथा राज्यातील शिक्षक चळवळीचे नेते पी.एस. घाडगे यांना 'प्राचार्य डॉ. विठ्ठल मोरे जीवनगौरव-२०२६' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याबाबत अधिक माहिती अशी की, प्राचार्य डॉक्टर विठ्ठल मोरे समाज विज्ञान फौंडेशन तर्फे शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यास 'प्राचार्य डॉ. विठ्ठल मोरे जीवनगौरव' पुरस्कार दिला जातो. यावर्षीचा पुरस्कार मराठवाडा शिक्षक संघाचे माजी अध्यक्ष पी. एस. घाडगे यांना देण्यात आला. मंगळवार दिनांक १४ एप्रिल रोजी प्राचार्य डॉक्टर विठ्ठल मोरे याच्या स्मृतिदिनी शहीद भगतसिंग महाविद्यालय, किल्लारी येथे प्राचार्य कुसुमताई मोरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या शानदार कार्यक्रमात, महाराष्ट्रातील ख्यातनाम साहित्यिक कवी व लेखक इंद्रजित भालेराव यांच्या हस्ते पी. एस. घाडगे यांना प्राचार्य विठ्ठल मोरे जीवनगौरव



पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी प्रदान करण्यात आलेल्या सन्मानपत्रात म्हटले आहे की आपण शैक्षणिक व सामाजिक चळवळीमधे सातत्याने सक्रिय राहून समाज घडविण्याचे महान कार्य केले आहे. शिक्षक चळवळीचे नेतृत्व करत असताना आपल्या ठाम विचारांनी, जिद्दीने आणि कार्यकर्त्यांच्या तळमळीने आपण अनेक शिक्षकांच्या जीवनात अमुलाग्र परिवर्तन घडवून आणले. आपले संपूर्ण जीवन सामाजिक परिवर्तन आणि शैक्षणिक सुधारणा यासाठी समर्पित राहिले आहे. आपल्या कार्यातून समाज जागृती, प्रबोधन आणि सकारात्मक बदल घडत राहिले...हीच आपल्या जीवनकार्याची खरी ओळख आहे.

आपल्या या प्रेरणादायी, नि:स्वार्थ आणि दैदिप्यमान कार्याची दखल घेऊन आपणांस 'प्राचार्य डॉक्टर विठ्ठल मोरे जीवनगौरव पुरस्कार-२०२६' प्रदान करून आम्ही सन्मानित करीत आहोत, याचा आम्हाला अत्यंत अभिमान वाटतो. आपले मार्गदर्शन असेच समाजाला लाभत राहो, आणि आपल्या कार्याची प्रेरणा नव्या पिढीस मिळत राहो ही सदिच्छा! प्राचार्य डॉक्टर विठ्ठल मोरे जीवनगौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल मराठवाडा शिक्षक संघाचे माजी सरचिटणीस व्ही. जी.पवार, अध्यक्ष सुर्यकांत विश्वासराव, सरचिटणीस राजकुमार कदम, उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवट्टे, गुट्टे एस.जी. कोषाध्यक्ष औताडे ए.बी.,सहसचिव पवार टी. जी.,माळी एन.जी.,श्रीमती रेखा साळुंखे, केंद्रीय कार्यकारणी सदस्य बंडू अघाव, अशोक मस्कले, मधुकर जोंधळे, रातोळे जी.जी., कुरेशी ए.ए., राठोड पी.आर., सुर्यवंशी आर.एन.,कदम व्ही. जी.,कौशल्य जी.पी.,पाटोदेकर ए.डी., सोळंके एन.टी.,वऱ्हाड बी.ए.,तिर्थकर एस.एस.,जमादार एफ.बी.,पाटील पी.एस.यांच्यासह जिल्हाध्यक्ष कालीदास धपाटे, व्यंकटराव चिलवरवार, बसवेश्वर माने,शेरखाने जे.एस.,रमेश आंधळे, यशवंत मकरंद, हरिभाऊ भडके, हाळदे के.एम. जिल्हासचिव गणेश आजबे, रविंद्र वाकोडे, भाई चंद्रकांत चव्हाण, माने जी.व्ही.,विक्रम मायाचारी,संजय यळवंते, कदम एन.टी., ढेंगळे व्ही.एस.,दिनेश पाटील, बीड जिल्ह्याचे माजी जिल्हाध्यक्ष तथा मार्गदर्शक डी. जी.तांदळे, लोकमान्य नागरी सहकारी पतस्थेंचे मुख्या कार्यकारी अधिकारी नितीन वायचळे, शाखाधिकारी चंद्रशेखर सरकटे व लोकमान्य परिवारातील पदिधिकारी व कर्मचाऱ्यांनी पी.एस. घाडगे यांचे अभिनंदन केले आहे.

# स्वामी विवेकानंद एज्युकेशनल अकॅडमीचे विद्यार्थी राज्य पातळीवर चमकले

**बीड । प्रतिनिधी**

अक्षरगंगा पब्लिकेशन, सांगली यांच्यावतीने आयोजित करण्यात येणारी अक्षरगंगा प्रज्ञाशोध परीक्षा ही एक लोकप्रिय शालेय स्पर्धा परीक्षा असून, नुकताच या परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. या परीक्षेत स्वामी विवेकानंद एज्युकेशनल अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत अकॅडमीचा लौकिक उंचावला आहे. या परीक्षेत इयत्ता पहिलीतील देवांश भागवत याने राज्यात पाचवा क्रमांक मिळवत आपली गुणवत्ता सिद्ध केली. तसेच इयत्ता दुसरीतील गौरांग काकडे याने जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावत उल्लेखनीय कामगिरी केली. इयत्ता तिसरीतील वेदिका देशमाने हिने केंद्रात प्रथम क्रमांक मिळवून विशेष यश संपादन केले, तर इयत्ता चौथीतील स्वरा खवले हिने केंद्रात द्वितीय क्रमांक पटकावत आपली गुणवत्ता अधोरेखित केली. या



घवघवीत यशानिमित्त अकॅडमीत गुणवंत विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी अकॅडमीच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले तसेच अकॅडमीचे सर्व संचालक यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे पालकांमध्येही आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, पालकांकडून विद्यार्थ्यांवर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. विद्यार्थ्यांची जिद्द, परिश्रम, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचा भक्कम पाठिंबा यामुळेच हे यश शक्य झाल्याचे अकॅडमीतर्फे सांगण्यात आले. अशा स्पर्धा परीक्षांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वृद्धिंगत होऊन त्यांच्या बौद्धिक विकासास चालना मिळते, असे मतही यावेळी व्यक्त करण्यात आले.

## डॉ. सामाजिक समतेसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आयुष्यभर लढा दिला: डॉ. विलास भिल्लारे

**चौसाळा । प्रतिनिधी**

येथील कला व महाविद्यालयामध्ये रा.से.यो. व ग्रंथालय विभागाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती निमित्त व्याखानाचे आयोजन करून साजरी करण्यात आली . यावेळी डॉ. आंबेडकरांचे सामाजिक विचार यावर डॉ. विलास भिल्लारे यांचे व्याखान झाले तर डॉ. आंबेडकरांचे आर्थिक विचार या विषयावर.सौ.अश्विनी तुवर मेडम यांचे व्याखान संपन्न झाले. यावेळी बोलताना डॉ. विलास भिल्लारे यांनी दिन,दलित,कष्टकरी व शोषित समाजाच्या सामाजिक न्यायासाठी आयुष्यभर लढा दिला. महाड येथील चवदार तळ्याचा सत्यागृह, नाशिक येथील काळाराम मंदिर प्रवेश ,जाती निर्मुलन इत्यादी अनेक सामाजिक न्यायावर सविस्तर मार्गदर्शन केले.



तर दुसऱ्या सत्रात प्रा.तुवर मेडम यांनी डॉ. आंबेडकर यांच्या आर्थिक विचाराने ,शेती,सिंचन,कष्टकरी मजूर कामगारांच्या कामाचे तास व वेतन या संघर्षाच्या त्याच्या कार्यावर प्रकाश टाकला. या प्रसंगी अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ.पंडित खाकरे यांनी डॉ. आंबेडकराचे संविधानाच्या निर्मितीमुळे भारतीय समाज आज एकत्र गुण्या गोविंदाने राहत आहे. असे विचार व्यक्त केले.यावेळी डॉ. बाबासाहेबांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर डॉ. सुधाकर वणवे,प्रा.गणपती धवळशंख हे उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी डॉ. अमर आलदे ,डॉ. संजय कदम, डॉ.हिरवे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. मनीषा गिराम तर आभार प्रदर्शन प्रा.सौ. शाहीन सय्यद यांनी केले. यावेळी अनेक प्राध्यापक ,विद्यार्थी मोठया संखेने उपस्थित होते.

# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये उत्साहात संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

येथील आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, प्रख्यात कायदे पंडित भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम या विद्यालयाचे मुख्याध्यापक बी.ए. हावळे यांच्या मुख्य उपस्थितीमध्ये संपन्न झाला.



या कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक बी.ए.हावळे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच शाळेतील शिक्षक एस.बी.मेश्राम, यु.बी. पवळ, आर.बी.घुले यांनी ही विद्यार्थ्यांना डॉ.बाबासाहेबांच्या जीवनाविषयी प्रसंग सांगून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी कार्यक्रमाचे संचालन यु.बी.पवळ, प्रास्ताविक श्रीमती एन.जी.मुंडे आणि आभार प्रदर्शन डब्ल्यु.एस.वाघमारे, यांनी केले. याप्रसंगी आनंद छात्रालयाचे अधीक्षक डी.व्ही. खरसाडे, से.नि. शिक्षक विजय देशमुख व शिक्षकेतर कर्मचारी सुभाष गायकवाड, एल.बी.हजारे, भारत कोळेकर, श्रीमती नेहा गायकवाड, यांच्या सह विद्यार्थी उपस्थित होते.

# कै.शिवाजीराव खाडे यांच्या चतुर्थ पुण्यस्मरणा निमित्त दोन दिवस कांदेवाडी येथे हरिनामाचा गजर

**श्री गोरक्षनाथ आखाडा पीलखेडा सिंदखेडचे ह.भ.प.श्री. योगी दत्तनाथजी महाराज यांचे रविवार, १९ एप्रिल रात्री ९ ते ११ होणार किर्तन**
**भागवताचार्य ह.भ.प.श्री. माऊली महाराज कोठुळे (भिवंडी) यांचे सोमवार २० एप्रिल सकाळी ११ ते १ होणार किर्तन**

### भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे– प्रदीप खाडे

**धारूर । प्रतिनिधी**

कांदेवाडी ता.धारूर येथील कै.शिवाजीराव रामभाऊ (अण्णा) खाडे यांच्या यांच्या दुसऱ्या पुण्यस्मरण दिनानिमित्त श्री गोरक्षनाथ आखाडा पीलखेडा सिंदखेडचे ह.भ.प.श्री. योगी दत्तनाथजी महाराज यांचे रविवार, १९ एप्रिल रात्री ९ ते ११ व भागवताचार्य ह.भ.प.श्री. माऊली महाराज कोठुळे (भिवंडी) यांचे सोमवार २० एप्रिल सकाळी ११ ते १ यांचे सुश्राव्य हरिकिर्तन होणार आहे. या सुश्राव्य कीर्तन कार्यक्रमास ग्रामस्थ व परिसरातील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन खाडे कुटुंबियांच्या वतीने करण्यात आले आहे. परळी विधानसभा मतदारसंघाचे सदस्य तथा धनंजय मुंडे यांचे विश्वासू प्रदीप खाडे, विलास खाडे, बालासाहेब खाडे यांचे वडील जेष्ठ नागरिक, शैक्षणिक क्षेत्रातील व्यक्तीमत्व कै.शिवाजीराव रामभाऊ (अण्णा) खाडे यांच्या पुण्यस्मरण कार्यक्रमाचे । मनि होता भोळेपणा कधी न दाखवला



मोठेपणा । अजूनही होता भास तुम्ही आहात जवळ पास । काळाने जरी हिरवले अनंत तुमची छाया । नित्य स्मरते आम्हा अनंत तुमचीच माया ।। वैशाख शु.३ शके १९४८ सोमवार, २० एप्रिल २०२६ रोजी आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने रविवार, १९ एप्रिल २०२६ रात्रौ ९ ते ११ श्री गोरक्षनाथ आखाडा पीलखेडा सिंदखेडचे ह.भ.प.श्री. योगी दत्तनाथजी महाराज यांचे हरिकिर्तन होईल. सोमवार, २० एप्रिल २०२६ सकाळी ११ ते १ भागवताचार्य ह.भ.प.श्री. माऊली महाराज कोठुळे (भिवंडी) यांचे सुश्राव्य हरिकिर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच भोजन वेळ सोमवार, २० एप्रिल २०२६ दुपारी १ ते आपल्या आगमनापर्यंत आहे. कांदेवाडी येथील बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे भुतपुर्व शाखाधिकारी शिवाजीराव खाडे हे बीड जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या परळी, आंबेजोगाई, बीड,घाटनांदुर व धर्मापुरी शाखेच्या व्यवस्थापक पदी त्यांनी काम केले होते . सर्वपरिचित असे ते व्यक्तिमत्व होते. रामायणाचे ते गाढे अभ्यासक होते. कांदेवाडी येथील पहिले पदवीधर म्हणून त्यांची विशेष ओळख होती. धारूरसह परळी व परिसरात जुने ज्येष्ठ व्यक्तीमत्व म्हणुन प्रसिध्द होते. या बरोबरच शेतीनिष्ठ शेतकरी म्हणुन ते परिचित होते. तसेच धार्मिक क्षेत्रा बरोबरच सामाजिक क्षेत्रासह अन्य कार्यात अग्रेसर म्हणून धारूर तालुक्यासह बीड जिल्ह्यात सुपरिचित असणारे व्यक्तीमत्व म्हणून कै.शिवाजीराव खाडे यांचे ओळख होती. कांदेवाडी येथील ग्रामस्थ, नातेवाईक,सर्व गुणीजण महाराज, गायक, वादक, भजनी मंडळी तसेच परिसरातील भाविक भक्तांनी सुश्राव्य किर्तन ऐकण्यासाठी व भोजनासाठी कांदेवाडी ता.धारूर (दिंद्रड येथून दक्षिणेस ६ किमी अंतरावर) येथे उपस्थित रहावे असे आवाहन परळी विधानसभा मतदारसंघाचे सदस्य धनंजय मुंडे यांचे विश्वासू प्रदिप शिवाजीराव खाडे (अध्यक्ष, कै.रामभाऊ आण्णा खाडे सेवाभावी संस्था, लातूर, अध्यक्ष श्री ज्ञानेश्वर बहुउद्देशिय शिक्षण प्रसारक मंडळ कुमठा, तथा सहसचिव नाथ शिक्षण संस्था परळी वैजनाथ), विलास शिवाजीराव खाडे, बालासाहेब शिवाजीराव खाडे यांनी केले आहे.

दैनिक मराठवाडा पत्र दि. १९/०४/२०२६

**टी.सी. हरवला आहे.**

सुनील बबननराव गायकवाड या नावाचा इयत्ता दहावी पासचा टी. सी. वं इतर कागदपत्रे हरवली आहेत. कोणाला सापडल्यास खालील क्रमांकवर संपर्क करावा. मो. क्रं. ९५१८५२१८११

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • रविवार दि. १९ एप्रिल २०२६ •

# गेवराईत अवैध मावा कारखान्यावर पोलिसांची धाड

**२ लाख १२ हजाराचा मुद्देमाल जप्त ;गेवराई पोलीस व अन्नसुरक्षा अधिकारी यांची संयुक्त कारवाई**

**बीड । प्रतिनिधी**

बीड राज्य सरकारने गुटखा व तंबाखूजन्य पदार्थावर बंदी केली असताना देखील बीड जिल्ह्यात मात्र गुटखा राजरोस विक्री केली जात असल्याचे चित्र दिसत आहे. बीड जिल्ह्यात गुटखा साठवण व विक्री करणारावर पोलिसाकडून कारवाईचा फास आवळला जात असून गुटखा माफीयावर पोलीस ठाण्यात गुन्हे देखील दाखल करण्यात आले आहेत.

बीड जिल्ह्यात अवैध गुटखा व मावा विक्रीवर आळा घालण्यासाठी सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत गेवराई पोलिसांनी मोठी कारवाई करत शहरातील एका ठिकाणी चालू असलेला मावा तयार करण्याचा कारखाना उध्वस्त केला. या कारवाईत सुमारे २ लाख १२ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. बीड पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांच्या आदेशानुसार जिल्हाभर अवैध गुटखा विक्रीविरोधात कारवाई सुरू आहे. त्याच अनुषंगाने १८ एप्रिल २०२६ रोजी गेवराई पोलीस स्टेशनच्या पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, जावेद निजाम शेख (वय ३८, रा. संजयनगर, गेवराई) हा आपल्या घरासमोरील खोलीत सुगंधित तंबाखूपासून मानवी आरोग्यास अपायकारक असा मावा तयार करून विक्री करत आहे.




मिळालेल्या खात्रीशीर माहितीनुसार पोलिसांनी तत्काळ छापा टाकत आरोपीला ताब्यात घेतले. त्यानंतर पत्र्याच्या शेडजवळील खोलीची झडती घेतली असता प्रतिबंधित सुगंधित तंबाखू, सुपारी व इतर घटकांचे मिश्रण करून तयार केलेला मावा, मिक्सर मशीन, मावा तयार करण्यासाठी वापरण्यात येणारी लोखंडी मोठी यंत्रणा आणि इतर साहित्य असा एकूण २,१२,७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई एफएसएल पथकाच्या उपस्थितीत करण्यात आली. अन्न व औषध प्रशासन विभागाचे अधिकारी अजय गाढे यांच्या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ तसेच भारतीय न्याय संहिता अंतर्गत विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीला अटक करण्यात आली आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक संजय उदगिरकर करीत आहेत.हे करत आहेत. ही कारवाई मा.पोलीस अधिक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके, पोलीस निरीक्षक किशोर पवार यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि राम खोत, पोउपनि/संजय उदगिरकर, पोह/कल्याण राठोड, पोह/गणेश घोलप, पोह/अशोक हंबर्डे, पोशि/गोरख डोके, पोशि/जितेंद्र ओव्हाळ, मपोशि/कोंता शेळके तसेच अन्न सुरक्षा अधिकारी बीड अजय गाढे यांनी केली. गुटखा साठवण व विक्री करणारावर कठोर कारवाई करण्यात येईल असा इशारा अन्नसुरक्षा अधिकारी यांनी दिला आहे.

# दानशूरांच्या पुढाकारातून श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड मंदिर उभारणीला वेग

**निंबाळकर व मटाले यांची लाखोंची देणगी**

**आष्टी । प्रतिनिधी**

श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान येथे सुरू असलेल्या मंदिर नवनिर्माणाच्या पवित्र कार्याला सध्या चांगलीच गती मिळत असून या उपक्रमासाठी विविध स्तरांतून सहकार्याचा ओघ वाढत आहे. भाविक व दानशूर व्यक्तींच्या पुढाकारामुळे मंदिर उभारणीचे काम अधिक वेगाने मार्गी लागत आहे. या पार्श्वभूमीवर आष्टी तालुक्यातील आष्टा ह.ना.गटाचे जि. प.सदस्य अमरराजे रावसाहेब निंबाळकर यांनी १,०१,०००/- रुपयांची उदार देणगी देवस्थान गडाचे विश्वस्त आमदार सुरेश धस यांच्या हस्ते दिली. तसेच पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील नाथभक्त वैशाली मोहन मटाले यांनीही १,००,०००/- रुपयांचा धनादेश गडाचे विश्वस्त आ. सुरेश धस यांच्या हस्ते देवस्थान समितीकडे सुपूर्द केला. या देणगीमुळे मंदिर उभारणीच्या कार्याला अधिक बळ मिळणार आहे.मंदिराच्या उभारणीमुळे परिसरात धार्मिक व आध्यात्मिक वातावरण अधिक बळकट होत असून स्थानिक भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. बडेबाबा सर्वांच्या मनोकामना पूर्ण करो, अशी भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली. मंदिर निर्माण कार्य हे केवळ धार्मिक नसून सामाजिक ऐक्याचे प्रतीक असल्याने समाजातील प्रत्येक घटकाचा सहभाग महत्त्वाचा आहे. या पवित्र उपक्रमात अधिकाधिक नागरिकांनी पुढाकार घेऊन योगदान द्यावे, असे गडाचे अध्यक्ष,उपाध्यक्ष सचिव व विश्वस्त तसेच देवस्थान समितीच्यावतीनेकरण्यातआलेआहे.



# बीड न.प.चा न्यायालयीन प्रक्रियेत मोठा विजय ; विकास कामांचा मार्ग मोकळा

**कामांचा दर्जा जपण्यासाठी नगराध्यक्षांनी घेतलेला निर्णय उच्च न्यायालयाकडून ग्राह्य**

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहराच्या विकासासाठी आणि कामाचा दर्जा राखण्यासाठी बीड नगर परिषदेने व नगराध्यक्षांनी घेतलेल्या कणखर निर्णयावर मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने शिक्कामोर्तब केले आहे. संयुक्त उपक्रमांना निविदा प्रक्रियेतून वगळण्याचा निर्णय हा केवळ प्रशासकीय नसून तो जनतेच्या हितासाठी घेतलेला एक धाडसी आणि पारदर्शक निर्णय असल्याचे न्यायालयाने आपल्या निकालातून स्पष्ट केले आहे.

बीड शहरातील विकास कामांच्या बाबतीत एका कंपनीने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या प्रकरणातनगर परिषदेची भक्कम बाजू बीड नगर परिषदेच्या वतीने ड. सय्यद तौसीफ यासीन यांनी मांडली. यावेळी ड.तौसीफ यांनी अत्यंत प्रभावीपणे मुद्देसूद युक्तिवाद केला. त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की, नगर परिषदेने घेतलेला निर्णय हा कोणत्याही कंत्राटदाराला त्रास देण्यासाठी नसून, कामात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व निर्माण करण्यासाठी आहे.शहराच्या विकासात अडथळा आणणाऱ्या तांत्रिक त्रुटी दूर करून सक्षम यंत्रणेद्वारे काम करून घेणे, हे परिषदेचे कर्तव्य आहे हे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. याचिकाकर्त्या कंपनीची मागील काही कामे प्रलंबित असल्याने, त्यांना निविदेत स्थान न देण्याचा निर्णय पूर्णपणे जनहितार्थ होता हेही स्पष्ट झाले आहे.या निकालामुळे बीड नगर परिषदेच्या पारदर्शक कारभाराचे आणि नगराध्यक्षांच्या विकासाप्रती असलेल्या बांधिलकीचे सर्वत्र कौतुक होत आहे. या निर्णयामुळे आता शहरात दर्जेदार विकासकामांचा मार्ग मोकळा झाला आहे.

### बीड नगर परिषद अध्यक्षांच्या 'कलम ५८' अंतर्गत अधिकारांवर शिक्कामोर्तब

**न्यायमूर्ती श्रीमती विभा कंकणवाडी आणि न्यायमूर्ती नीरज पी. धोटे यांनी स्पष्ट केले की, निविदा प्रक्रियेत कोणते नियम असावेत हे ठरवण्याचा पूर्ण अधिकार संबंधित प्राधिकरणाला आहे. नगराध्यक्षांनी घेतलेला निर्णय हा दुर्भावनापूर्ण (Mala fide) नसून तो कामाची गुणवत्ता सुधारण्यासाठी घेतलेला 'प्रशासकीय निर्णय' असल्याचे न्यायालयाने मान्य केले. नगर परिषद कायद्यातील कलम ५८ नुसार प्रशासनावर देखरेख ठेवण्याचे अध्यक्षांचे अधिकार न्यायालयाने मान्य केले.**

### कामाच्या गुणवत्तेशी तडजोड नाही , आ. विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली नगराध्यक्षांची भूमिका योग्यच ठरली

**बीड शहरात ३० विविध विकासकामे करण्यासाठी काढण्यात आलेल्या निविदेमध्ये नगर परिषद अध्यक्षांनी काही महत्त्वपूर्ण सुधारणा सुचवल्या होत्या. यापूर्वीच्या अनुभवांनुसार, संयुक्त उपक्रमाद्वारे (गत) केलेली कामे अनेकदा अर्धवट राहतात किंवा त्यांचा दर्जा निकृष्ट असतो, असे निरीक्षण त्यांनी नोंदवले होते. सार्वजनिक निधीचा योग्य विनियोग व्हावा आणि शहराला दर्जेदार पायाभूत सुविधा मिळाव्यात, या हेतूने त्यांनी घेतलेली भूमिका उच्च न्यायालयाने वैध ठरवली आहे. दरम्यान आ. विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली नगराध्यक्ष प्रेमलताताई पारवे यांनी घेतलेली भूमिका योग्य ठरली असून शहरात लवकरच विकास कामांना सुरुवात होणार आहे.**

# किरण शिनगीरे यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमाने साजरा

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टीचे युवा सामाजिक कार्यकर्ते किरण भगवानराव शिनगीरे यांच्या अभिष्टचिंतन दिनानिमित्त शुक्रवार दिनांक १७ एप्रिल रोजी विविध माध्यमातून शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला, तसेच त्याचबरोबर नवजीवन संगोपन केंद्र आष्टी येथील विद्यार्थ्यांना अन्नधान्य, किराणा आणि खाऊ देऊन वाढदिवस साजरा केला.

प्रत्यक्ष भेटून त्यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी युवा नेते जयदत्त भैय्या धस यांनी त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. त्याचबरोबर सागर आप्पा धस, सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे, भगवानराव शिनगिरे, सभापती रमजान तांबोळी, सरपंच युवराज पाटील, संचालक रामशेठ मधुरकर, माजी सरपंच सतीश शेठ धस, भाजपा तालुका अध्यक्ष रमेश गावडे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी संजय मस्के, झुंजार नेताचे उपसंपादक उत्तमराव बोडखे, सरपंच संदीप खकाळ, सरपंच सुखदेव खोटे,



सरपंच अशोक मुळे, सरपंच सागर दहातोंडे, सरपंच संदीप मार्कंडे, सरपंच शहाजी साप्ते, सरपंच विठ्ठलराव राख, संभा दादा कर्डिले, भाऊसाहेब तावरे, अरुण पडोळे, महेश कोकणे, सरपंच पोपट गोंडे, राम धुमाळ, सरपंच चव्हाण डोंगरगण, माजी सरपंच नवनाथ नागरगोजे, माजी सरपंच छगन शिनगिरे, माजी सरपंच संजय पोकळे, माजी सरपंच अतुल कोठुळे, रावसाहेब मुटकुळे, विजय खकाळ, बाळासाहेब खकाळ, गौतम खंडागळे, मेजर विकास मस्के, उपसरपंच संतोष मुटकुळे, युवराज मुटकुळे उपसरपंच बाळासाहेब थोरवे, संस्थाचालक दिलीप वायभासे , संस्थाचालक, वैजिनाथ निर्मळ, अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष योगेश शेठ भंडारी,सचिव हेमंत शेठ पोखरणा, कोषाध्यक्ष डॉ. उमेश गांधी, डॉ. महेंद्र पटवा, संजय मेहेर, युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, पत्रकार रामदास जाधव, पत्रकार अनिरुद्ध धर्माधिकारी, पत्रकार राजेंद्र लाड, पत्रकार शरद रेडेकर, पत्रकार अण्णासाहेब साबळे, पत्रकार समीर शेख, पत्रकार, अक्षय विधाते, पत्रकार शरद गर्जे, पत्रकार संतोष नागरगोजे, पत्रकार भीमराव गुरव, पत्रकार आदिनाथ ठोंबरे, पत्रकार मनोज पोकळे, विस्ताराधिकारी काळे, ग्रामविकास अधिकारी नवनाथ लोंढे, अमोल धोंडे, पांडुळे, देविदास जरांगे, संपत कोळेकर, बापू आहेर, दीपक शिरोळे, बबन वायकर, बाळू पोकळे, महादेव जाधव, भाऊसाहेब शिरोळे, तुकाराम गोंदकर सर, घुले सर, सय्यद सर, विकास शिनगिरे, बळीराम शिनगिरे, राजू खकाळ, प्रवीण शिनगिरे, महेश शिनगिरे, दत्ता मिसाळ, अमोल जाधव, प्रवीण कासार, एकनाथ गायकवाड, कृष्णा शेलार, सुशांत नरवडे, गुड्डू पोकळे, निलेश पोकळे, ईश्वर कर्डिले, सचिन शेलार, सह भगवान दादा शिनगिरे युवा मंच आष्टी तालुका, जी एस किरण शिनगिरे मित्रपरिवार, वटणवाडी ग्रामस्थ सह आदी मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.

## थोडक्यात...

### भव्य परशुराम जन्मोत्सव निमित्त भव्य शोभायात्रा



**मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे नागरिकांना आवाहन**

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरात भगवान परशुराम जन्मोत्सव २०२६ निमित्त विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, या उत्सवातील प्रमुख आकर्षण असलेल्या भव्य शोभायात्रेत नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन परशुराम जन्मोत्सव समिती, बीड शहर यांच्या वतीने करण्यात आले आहे. संघटन, संघर्ष आणि सन्मान या ब्रीदवाक्याखाली दरवर्षी साजरा होणारा हा जन्मोत्सव यंदाही उत्साहात पार पडणार आहे. भगवान परशुराम जन्मोत्सव हा समाजासाठी अत्यंत महत्त्वाचा उपक्रम असून, या निमित्ताने एकत्र येऊन एकात्मतेचा संदेश देणे हेच उद्दिष्ट असल्याचे आयोजकांनी सांगितले. यंदाची भव्य शोभायात्रा रविवार, दि. १९ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता धोंडीपुरा, बीड येथून प्रारंभ होणार असून, सर्वेश्वर गणपती मंदिर, सहयोगनगर, बीड येथे समारोप होईल. या शोभायात्रेत विविध धार्मिक देखावे, पारंपरिक वेशभूषा आणि उत्साहपूर्ण वातावरण पाहायला मिळणार आहे. या कार्यक्रमासाठी संस्थापक अध्यक्ष अक्षय कुलकर्णी (भालेराव) यांच्या मार्गदर्शनाखाली अध्यक्ष संदीप पालसिंगनकर, उपाध्यक्ष आकाश जवकर, सचिव रोहित कुलकर्णी व सहसचिव शुभम कायदे हे पदाधिकारी विशेष प्रयत्न करत आहेत. तरी बीड शहरातील सर्व नागरिक, युवक व समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शोभायात्रेची शोभा वाढवावी, असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

### भागूजीराव ढेकळे विद्यालयाच्या किशोरी साठेचे कराटे चॅम्पियन स्पर्धेत यश



**गेवराई । प्रतिनिधी**

तालुक्यातील पाडळसिंगी येथील कृषि पंडित भागूजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या किशोरी साठे या विद्यार्थीनीने राज्यस्तरीय ओपन कराटे चॅम्पियन स्पर्धेत कास्यपदक संपादन केले आहे. धाराशिव येथे झालेल्या राज्यस्तरीय ओपन कराटे चॅम्पियन स्पर्धेमध्ये कृषी पंडित भागूजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पाडळसिंगी, ता. गेवराई जिल्हा बीड ची इ.११ वी ची विद्यार्थिनी कु. साठे किशोरी लक्ष्मण हिने कास्यपदक संपादन केले. तिच्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर, युवा नेते रोहित क्षीरसागर, प्रशासन अधिकारी डॉ. राजा मचाले, सहाय्यक प्रशासन अधिकारी योगेश पवार, कार्यवाहक एम. ए. राऊत, कृषी पंडित भागुजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य थिटे ए. एस., पर्यवेक्षक राजेंद्र रांजवण, सोनवणे आर. आर., क्रीडा विभाग प्रमुख कळासे ए. आर., घोरड आर. डी., सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, ग्रामस्थांनी तिचे हार्दिक अभिनंदन केले व पुढील कार्यासाठी खूप-खूप शुभेच्छा दिल्या.